# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

**UGC Approved Research Journal (Sr. 47674)**

Volume IV
Issue XII

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

December 2017


A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos


**Chief Editor**
Dr. V. H. Mane

**Executive Editor**
Prof. M. P. Shaikh



www.ijmms.in | Email : ijmms14@gmail.com

| | | | |
|---|---|---|---|
| 18. | Hon'ble Sharad Pawarji's contribution towards empowerment of woman, by upbringing her 'self esteem and social status | Prof.Gauri M. Kulkarni | 81-83 |
| 19. | Analysis of Information Retrieved from Google: A Case Study | Prof. Priyanka Naikwadi | 84-85 |
| 20. | Empowering Women Leads to A More Inclusive Growth of Society and The Nation | Prin.Dr. Shubhada Gholap | 86-88 |
| 21 | Sharad Pawar A Visionary Leader Who Empowered Women | Prof. Madhuri S. Shirlekar | 89-93 |
| २२ | मा.शरदरावजी पवार: स्त्री वर्गाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे द्रष्टे नेते | प्राचार्य.डॉ.सौ.शोभा बाळासाहेब इंगवले | ९४-९७ |
| २३ | संघर्षमय प्रेरणादायी जीवनपट | प्रा.नाईकवाडी व्ही.ए. | ९८-१०१ |
| २४ | आधुनिक भारताच्या विकासातील शरदचंद्र पवारसाहेब यांचे योगदान | डॉ.पांडुरंग उत्तमराव मिसाळ | १०२-१०६ |
| २५ | शरद पवार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे नामांतर | डॉ.माणिक सोनावणे | १०७-११० |
| २६ | शेतकऱ्यांचे कैवारी: शरदराव पवार साहेब | डॉ.डी.डी.पठारे | १११-११३ |
| २७ | मा.शरदराव पवार साहेब यांच्या व्यक्तिमत्वाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास | [1]डॉ.उमाकांत सुभाष गायकवाड [2]अश्विनी संतोष बळसाने | ११४-११७ |
| २८ | स्त्री सबलीकरण आणि भविष्य समजणारा नेता शरदचंद्र पवार: एक अभ्यास | पवार अलोक अर्जुन अलका | ११८-१२५ |
| २९ | क्रीडा क्षेत्रातील शरद पवारांचे बहुमोल कार्य | डॉ.नेहा देविदास नलावडे | १२६-१२८ |
| ३० | शरद पवार: एक व्यक्तिवेध | डॉ.सौ.सीमा सागर काळभोर | १२९-१३१ |
| ३१ | शरद पवार आणि महिला धोरण | डॉ.मंजिरी कारेकर | १३२-१३६ |
| ३२ | मा.शरदचंद्र पवारांचे भारतीय कृषी क्षेत्रातील योगदान | डॉ.एस.के.ढगे | १३७-१३९ |
| ३३ | यशवंतरावांचे वैचारिक वारसदार: शरद पवार | डॉ.पंडित महादेव लावंड | १४०-१४६ |
| ३४ | एक अष्टपैलू व्यक्तीमत्व: श्री शरद पवार | [1]डॉ.एम.एस.चांदा [2]डॉ.यु.डी.सुर्यवंशी | १४७-१५० |
| ३५ | दुसऱ्या हरितक्रांतीचे शिल्पकार-पद्मविभूषण श्री.शरदचंद्रजी पवार साहेब | दिपाली रामदास चिंचवडे | १५१-१५३ |

# शरद पवार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे नामांतर

डॉ. माणिक सोनावणे
टि. म. वि. पुणे.

महाराष्ट्र आणि भारताच्या समाजिक, आर्थिक, राजकीय, क्रीडा, शिक्षण, साहित्य - संस्कृती आणि शेती सारख्या सर्वच क्षेत्रात ज्यांच्या नावाचा दबदबा आहे अशा अजातशत्रू श्री. शरद पवार यांचे कार्य सतत ५० वर्षे आपल्या समोर आहे. शरद पवार म्हणजे विकासाचे स्वन्प बघणाऱ्या वर्तमान आणि भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांचे अशा विविधांगी कार्यातून त्यांच्या चतुरस्त व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. निवडणूकीच्या राजकारणात सतत ५० वर्षे विधानसभा, विधान परिषद, लोकसभा आणि राज्यसभा या चारी सभागृहांचे प्रतिनिधित्व करण्याची व त्या माध्यमातून देशाच्या व जनतेच्या कल्याणासाठी झटत असलेल्या शरद पवारांची कारकीर्द स्फूर्तिदायी आहे.

बारामतीचा चेहरा मोहरा बदलेला दिसतो तो त्यांच्या विकास संकल्पनेचा मूर्तीमंत नमुना आहे. या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बारामतीचा विकास पाहून आश्च्छर्य वाटते. विद्या प्रतिष्ठान, कृषी प्रतिष्ठान, सारख्या अनेक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी बारामतीचा चेहरा मोहरा बदलला आहे. महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री, देशाचे संरक्षण मंत्री, काँग्रेस प्रणित युपीएच्या सरकारमध्ये स्वईछेने कृषी मंत्री पद मागून घेतलेले शरद पवार त्यांनी घेतलेल्या निर्णयासाठी नेहमीच कौतूकास पात्र ठरले आहेत. अशा प्रकारे सर्व सामान्यांचा नेता आणि सर्व समाज घटकांपर्यत पोहोचलेले नेतृत्व म्हणून त्यांची ख्याती आहे.

महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची पाठराखण करताना शरद पवारांनी घेतलेले निर्णय दूरगामी परिणाम करणारे ठरले आहेत. महिला विषयक घोरणाची आखणी व अंमलबजावणी केल्यामुळे महिला वर्गाच्या हितसंबधाची जपणूक व संवर्धन करण्यामध्ये शरद पवारांची भुमिका अत्यंत महत्वाची ठरली आहे. त्यांनी घेतलेले निर्णय वेळप्रसंगी त्यांना हादरे देणारे ठरले असले तरी घेतलेल्या निर्णयावर ठाम रहणारे शरद पवार दलित बहुजनंमधेही तेवढेच लोकप्रिय आहेत. सर्व स्तरातील समाज घटकांच्या भावणांची दखल घेण्यासाठीही सुपरिचीत आहेत.

महाराष्ट्रात होऊन गेलेल्या महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी आणि समताधिष्टीत विचारांची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी शरद पवारांनी मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचां संबध मराठवाड्याशी जोडून मराठवाड्याची अस्मिता जपण्याचा आणि लोकभवणेचा आदर करण्याचा प्रयत्न केला आहे.

वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर तत्कालिन मुख्यमंत्री कै.यशवंतरावजी चव्हाण यांनी नागपूर येथील दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेबांचे चिरंतन स्मारक उभारण्यासाठीची मागणी पूर्ण केली होती. या कार्यात कै. यशवंतरावजी चव्हाण यांचे बरोबर सहभागी होण्याची संधी शरद पवारांना मिळाल्याचा त्यांना आनंद वाटत असे. १९७८ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मोठ्या हिमतीने २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्राच्या विधानसभेत मराठवाडा विद्यापीठास 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामांतराचा ऐतिहासिक ठराव आणला. या निर्णयाचा दुर्गामी परिणाम होण्याची जाणिव असताना आणि राजकीय भवितव्याची काळजी न करता शरद पवारांनी मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देऊन डॉ. आंबेडकरांची अस्मिता जपण्याचा प्रयत्न केला. त्यांनी घेतलेला हा निर्णय देशात सामाजिक न्याय निर्मितीचा महत्वपूर्ण निर्णय ठरला. वास्तविक पाहता मराठवाडा विद्यापीठाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामकरण करण्याची मागणी फार जुनी होती. डॉ.आंबेडकरांचे शिक्षण क्षेत्रातले विचार आणि कार्य त्यांची विद्वता समस्त मराठवाड्यातील जनतेला सतत प्रेरणा देत राहणारी आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची जाणीव ठेऊन शरद पवारांनी नामविस्ताराचा निर्णय घेतला.

सामाजिक परिवर्तनाचे व समाज उद्धाराचे महान कार्य, दलित समाजाचा खरा उद्धारक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अशा विविध विशेषनांनी गौरविलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या देशातील कोणत्याही विद्यापीठास देणे योग्यच होते. मागास आणि विकासापासून दूर राहिलेल्या मराठवाड्यातील बहुजनांसाठी आणि विशेषत: दलितवर्गासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या कामाचे चिरकाळ स्मरण ठेवण्यासाठी मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जोडण्यात यावे ही दलित पँथर आणि तत्सम दलित संघटनांची मागणी होती यासाठी महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील

दलितांची तरुण पिढी नामांतरसाठी संघर्ष करीत होती. त्यातच १९७७ साली डॉ. आंबेडकरांनी केलेल्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्यागृहास ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने झालेल्या विविध कार्यक्रमात मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याची मागणी मोठ्या प्रखरतेने पुढे आली. तेव्हापासून या नामांतराच्या चळवळीला धार आली. देशातील गरीब, अज्ञानी लोकांसाठी एक ज्ञानपीठ उभारण्याची डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांची कल्पना होती. त्यांच्या मते माणसाला नुसती राजकीय समता नको तर त्यास सामाजिक न्याय व आर्थिक न्यायही मिळाला पाहिजे. त्याचबरोबर सर्व दुर्बलांना सहज शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. शिक्षणाची दारे सर्वांना खुली करून देण्यासाठी मराठवादड्यातील औरंगाबाद येथे त्यांनी १५० एकराचे परिसरात 'मिलिंद महाविद्यालय' सुरू केले होते. दुसरीकडे महात्मा गांधींनी सांगितले होते की, 'दलित माणसाला ज्या सामाजिक चौकटीत ठेवलेले आहे त्या सामाजिक चौकटीतून बाहेर काढल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही'. म्हणून दलित माणसाच्या उद्धारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चळवळ सुरु केली. या सर्व पार्शवभूमीची दखल घेऊन शरद पवारांनी मराठवाडा विद्यापिठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा गैरव केला तर विद्यापिठाच्या नावात मराठवाडा शब्द ठेऊन मराठवाड्यातील तत्सम विरोधी भावनांचा देखिल आदर ठेवला.

१९७८ साली महारष्ट्र विधासभेसमोर मांडलेल्या नामांतराच्या ठरावाला सभागृहातील सर्व पक्षांच्या सदस्यांनी पाठींबा दिला. या ठरावाचे चर्चेचा समारोपाच्या भाषणात शरद पवारांनी ठरावाच्या चर्चेमध्ये सहभागी झालेल्या सर्व सदस्यांचे आभार मानले आणि या विद्यापिठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारी तरुणपिढी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्य, समता, बंधुता व समन्याय हे मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ विचार घेऊन समाजापुढे जाईल असा अशावाद व्यक्त केला.

मराठवाडा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबाबतच्या निर्णयाची प्रतिक्रिया महाराष्ट्र आणि मराठवाड्याचे सर्व भागात तीव्रपणे उमटली. औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड या भागात लोकांनी मोर्चे काढले, जाळपोळ सुरू केली. मराठवाड्याच्या सर्व भागात दंगली उसळल्या, भीषण परिस्थिती निर्माण झाली. खेडोपाडी दलितांची घरे जाळण्यात आली. मराठवाड्डा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्या बाबतचा निर्णय घेण्यापूर्वी मराठवाड्यातील जनतेला विश्वासात घेतले नाही असा आरोप शरद पवारांवर केला गेला. शरद पवारांनी मराठवाड्यातील जनतेचा विश्वासघात केला अशी टिका त्यांचावर झाली. या ठरावाने मराठवाड्याची अस्मिता भंग झाली असा प्रचार झाला. त्यामुळे भावनेच्या आहारी जाऊन मराठवाड्यातील तरुण विशेषत: विद्यार्थीवर्ग फार मोठ्या संस्थेने हिंसक बनून रस्त्यावर आला. मराठवाड्यातील जनजीवन अक्षरश: होरपळून निघाले. १०-१२ दिवसात मराठवाड्यात ज्या काही विध्वंसक घटना घडल्या त्यामुळे महाराष्ट्र हादरला. औरंगाबाद, नांदेड, उदगीर, आंबेजोगाई व लातूर ही मराठवाड्यातील शैक्षणिक केंद्रावर दंगलीची तीव्रता जास्त होती. मराठवाड्यातील तालुक्याच्या गावी व इतर मोठ्या गावी गाढवांचे मोर्चे निघाले. गाढवांच्या पाठीवर शरद पवार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नावे लिहली गेली. 'आमदारांनो बापाचं नाव बदला आणि मगच गावात या', असे बोर्ड लिहिणे. गावागावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे विद्रुप केल गेले. बुद्धविहारातील बुद्धाच्या मूर्ती फोडल्या, सार्वजनिक मालमत्तेची प्रचंड हानी झाली. ज्या बँकांनी दलितांना आर्थिक मदत केली होती त्या बँकाचीही होळी करण्यात आली. दलितांची अवस्था हृदयाला पीळ पाडणारी होती. निष्पाप माणसांची खेड्यापाड्यात छळवणूक केली गेली. त्यांना मारहाण, संसाराची धुळधाण, घराची जाळपोळ, पिकांची नासधूस असे माणूसकीला काळीमा फासणारे प्रकार केले गेले. मराठवाड्यातील दलित विरोधातील आंदोलनाचे हे लोण हळूहळू महाराष्ट्राचे इतर भागांनाही विशेषत: सोलापूर, धुळे, नाशिक, पुणे, जळगाव या भागात पसरले.

मराठवाड्याच्या अस्मितेला धक्का लागला म्हणून मराठवाड्यातील बहुजन समाज शरद पवार व पुलोद सरकारच्या विरोधात उभा राहिला. महाराष्ट्रातील शरद पवारांचे सरकार पाडण्यासाठीच्या उठाठेवीही झाल्या. शरद पवारांना बदनाम करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न विरोधी पक्षाकडून झाले. नामांतर ठरावाच्या दुसऱ्या दिवशी २८ जुलै १९७८ रोजी विधानसभेत विरोधी पक्ष सदस्यांकडून स्थगत प्रस्ताव आणला गेला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरानंतर उद्भवलेला परिस्थितीसंबंधी या सभागृहात स्थगत प्रस्ताव मांडताना सभागृहाचे विरोधी पक्षांनी नामांतराचा ठराव आणताना मराठवाड्यात निर्माण होणाऱ्या कायदा सुव्यवस्थेत परिणामांचा व सामाजिक तणावाचा कोणताही विचार न करता केवळ सवंग लोकप्रियता मिळवणेसाठी मोठ्या घाईगर्दीने नामांतराचा हा ठराव आणला अशी शरद पवारांवर टिका केली.

शरद पवारांनी त्यांच्या सरकारच्या भवितव्याचा कोणताही विचार केला नाही उलट महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांची व चळवळीची जी पिछेहाट झाली त्याबद्दल खंत व्यक्त केली आणि 'समाजातील पुरोगामी विचारांच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी, वृत्तपत्रांनी समतेच्या प्रबोधनाची व समाजा - समाजामध्ये सामंजस्य निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडावी आणि शासनाला या बिकट परिस्थितीत सहकार्य करावे' असे अवाहन केले.

मराठवाडा विद्यापिठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याबाबतच्या नामांतराच्या या ठरावामधून महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला व म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे विचारांना नवी चालना मिळेल, या विचारांना गती मिळेल असा विश्वास त्यांना वाटत होता. म्हणून पुरोगामी विचारांचा नामांतराचा ठराव कोणत्याही परिस्थितीत बदलायचा नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. झालेल्या टिका सहन केल्या. परिस्थितीला खंबीरपणे तोंड दिले.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या ठरावामुळे मराठवाड्यात उसळली दंगल दहा-बारा दिवसानंतर थंडावली. लोकजीवन हळूहळू पूर्वपदावर येऊ लागले. या दंगलीत १०० खेड्यातील दलितांची जवळ-जवळ १२०० घरे व झोपड्या उध्दवस्त झाल्या. सार्वजनिक मालमत्तेत १२५ एस.टी. रेल्वे १२ डबे, अनेक सरकारी, निमसरकारी इमारती, कार्यालये, शासकीय वाहने, रस्ते, पुल इत्यादी गोष्टी या दंगलीच्या तडाख्यात सापडल्या. सार्वजनिक व खाजगी मालमत्तेची १ कोटी पर्यंत हानी झाली. शरद पवारांनी त्याही परिस्थितीत विचलित न होता दलितांचे पुर्नवसनास अग्रक्रम दिला. तसेच दंगल भागातील समाजजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी बंदुकीचे गोळीबारावर न जाता समाजा-समाजामध्ये सामंजस्य निर्माण करण्याचे तसेच प्रश्नामुळे दुभंगलेल्या समाजाचे मनोमीलन करण्याचा निर्णय त्यांनी मोठ्या चतुराईने घेतला. उद्धवस्त झालेल्या दलितांच्या सर्व घरांचा व झोपड्यांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर घेतला. या दंगलीत काही लोक मारले गेले होते. त्यांच्या वारसांना मदत देण्यात आली. काही लोकांच्या संसारोपयोगी वस्तुंचे नुकसान झाले होते. त्यांनाही नुकसान भरपाई देण्यात आली. या दंगलीत झळ बसलेल्या दलित समाजाचे चांगल्या प्रकारे पुर्नवसन करण्यात आले. त्यांना योग्य तो न्याय देण्याची भूमिका शरद पवारांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून यशस्वीरित्या पार पाडली. त्यांचे जीवन पूर्वपदावर येण्यासाठी त्यांच्यातील भीतीचे वातावरण त्यांनी दूर केले.

मराठवाड्याची अस्मिता व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठवाडा विद्यापीठास देऊ केलेले नाव हा टकराव कमीत-कमी होण्यास दलित व सवर्ण यांच्यात उभय बाजूचे हित आहे, याची जाणीव शरद पवारांनी या दोन्ही घटकात करुन दिली. त्यासाठी त्यांनी मराठवाड्यात निरनिराळ्या ठिकाणी बैठका घेतल्या. दलितांचे पुर्नवसन करण्यासाठी समाजसेवी संस्थांना त्यांनी मदतीचे आवाहन केले. शरदरावांचे आवाहनानुसार महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांच्या अनेक समाजसेवी संघटना दलितांचे पुर्नवसन करण्याचे कामी पुढे आल्या. त्यांनी मदतीचा हात दिला. हे सर्व करीत असताना शरद पवारांनी विरोधी पक्षाला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देताना म्हटले की, ''मला विरोधी पक्षाला नम्रपणे विनंती करायची आहे की, एका बाजूला नामांतराचे निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे व त्या संबंधीची भूमिका स्पष्टपणे सांगायची आणि मराठवाड्यात नामांतरास विरोध करण्यासाठी बैठक बोलावयाची भूमिका घ्यायची असे वागणे चुकीचे आहे. राजकारणामध्ये मतभेद जरुर असतात पण सामाजिक प्रश्नांची तीव्रता समाजामध्ये निर्माण होते त्यावेळी आपल्या राजकारणाची पोळी भाजण्याचे दुष्कृत्य हे जबाबदार विरोधी पक्षाने करु नये.''

२७/७/१९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतराचा ठराव विधानसभेत सर्वानुमते संम्मत होऊनही या ठरावाची अंमलबजावणी होऊ शकत नव्हती, याची सल शरद पवारांना सलत होती. त्यांचे मनात समतेचा, सामाजिक न्यायाचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्मितेचा हा विचार आपण पुढे नेऊ शकत नाहीत याच खंत होती. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात सत्तांतरे झाली. परंतु त्यानंतरच्या कोणत्याही सरकारने या ठरावाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला नाही. तथापि शरद पवार मात्र या ठरावाची अंमलबजाावणी करण्यासाठी योग्य संधीची वाट पाहत होते.

१९९३ मध्ये चौथ्या वेळेस शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांचे मनाने नामांतराच्या या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे ठरवले. यापूर्वी ते तीन वेळी या राज्याचे मुख्यमंत्री होऊनही व त्यांचे मनात नामांतराचे ठरावाची अंमलबजावणी करण्याचे असूनही ते त्यांचे मनासारखे या बाबतीत काही करु शकले नाहीत याचीही बोचणी त्यांच्या मनाला सारखी लागली होती. १९९३ मधील विधानसभेच्या नागपूर अधिवेशन काळात त्यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने नागपूर येथे

आलेल्या निरनिराळया संस्था व व्यक्ती यांनी मोठ्या प्रमाणात साजरा केला. त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी काही पुरोगामी विचारांच्या संघटनांनी त्यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले व त्यांना विधानसभेने एकमताने पारित केलेल्या मराठवाडा नामांतराच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची आठवण करुन दिली. नामांतराचा ठराव विधानसभेत पारीत झाल्यापासून गेली १५ वर्षे ते या नामांतराच्या अंमलबजावणीची वाट पहात राहिले.

१९७८ ची नामांतराचा ठराव पास झाल्यानंतर उद्भवलेली परस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी मराठवाड्यातील सर्व जातीधर्माच्या लोकांना विश्वासात घेणे जरुरीचे होते. या सर्वांमध्ये सामंजस्याचे वातावरण निर्माण करणे जरुरीचे होते. या सामंजस्य व पोषक वातावरण निर्मितीसाठीचा प्रयत्न म्हणून त्यांनी नामांतराचे समर्थक व विरोधक यांच्यात अनेकवेळा एकत्रित बैठका घेतल्या. दोन्ही समाजघटकामध्ये असलेली एकमेकांविषयीची द्वेष भावना काढून टाकण्याचा व कमी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले. प्रशासकीय यंत्रणेलाही विश्वासात घेतले. त्यांचेशीही सल्लामसलत केली आणि तत्सम अडचणी समजावून घेतल्या. निरनिराळ्या समाजघटकांशी नामांतराविषयीच्या अडचणी समजावून घेत असताना शरद पवारांनी १९७८ सालीच्या दंगलीच्या काळात घडलेल्या घटनांचाही विस्ताराने विचार केला. दंगलींच्या काळात घडलेल्या सर्व अनुचित घटनांची अचूक माहिती घेतली. या ठरावाची अंमलबजावणी करताना परत दंगल उसळू नये म्हणून करावयाच्या उपाययोजनांचा गाववार आराखडा केला. नामांतराच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रचंड मोठी तयारी केली. मराठवाड्यातील निरनिराळ्या समाजघटकांना विश्वासात घेताना त्यांनी तरुण व विद्यार्थी बर्गालाही विश्वासात घेतले. दंगलीच्या काळात ज्याठिकाणी भागाला सर्वात जास्त झळ पोहचली ती ठिकाणे त्यांनी नक्की केली. मराठवाड्यातील समाज मनात बदल त्यांना हवा होता तो बदल करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न सतत १५ वर्षे अखंडपणे सत्तेवर नसतानाही करीत राहिले.

शरद पवार नामांतराच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे दीर्घकाळचे स्वप्न प्रत्यक्षात येण्याचा दिवस उजाडला आणि १४ जानेवारी १९९४ या दिवशी मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव जोडले गेले. २७ जुलै १९७८ रोजी विधानसभेत एकमताने पारित झालेल्या नामांतराच्या ठरावाची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी केली. मराठवाड्यातील विविध समाजातील काही घटकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन विचारात घेण्यासाठी नांदेड येथिल विद्यापीठाला 'स्वामी रामानंद तीर्थ' यांचे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन शरद पवारांनी स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील कार्याला व स्वातंत्र्य चळवळीतल्या योगदानाला मानवंदनाचा दिल्ली.

अशा प्रकारे शरद पवारांनी पुरोगामी विचाराची अंमलबजावणी करताना कोणत्याही परिणामांची तमा बाळगली नाही. परिणामी १९९४ च्या मार्च महिन्यात झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला व पुरोगामी महाराष्ट्रात पहिल्या प्रथम शिवसेना – भारतीय जनता पक्ष या युती सत्तेवर आली. अशा प्रकारे महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुरोगामी विचार या महाराष्ट्रात रुजविण्यासाठी व या विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी सत्तेची मोठी किंमत मोजण्यासही शरद पवारांनी मागेपुढे पाहिले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतराची घटना शरदरावांच्या ठायी असलेल्या पुरोगामी विचारांची खरी साक्ष देते. त्यांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासात त्यांचे नाव कायमचे जोडले गेले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर पुरोगामी विचार आपल्या कृतीने आचरणात आणणारे व ते राबविणारे शरद पवार हे एकमेव नेते ठरले.

## संदर्भ:

१) कांडगे राम, 'लोकनेते शरदराव पवार', प्रशासक, राजश्री प्रकाशन चाकण प्रथम आवृत्ती – नोव्हेंबर २०१०.
२) राऊत भारतकुमार, 'एक दृष्टा नेता', आम्ही पाहिलेले शरद पवार, संपादन अरुण शेवते, ऋतुगंध प्रकाशान गोरेगाव (पुर्व) मुंबइ दुसरी आवृत्ती एप्रिल २००७.
३) शरद पवार 'लोक माझ्या सांगाती – राजकीय आत्मकथा', राजहंस प्रकाशन, २०१५.
४) शरद पवार, 'स्पर्धा काळाशी', रोहन प्रकाशन.
५) शरद पवार, 'दुसरी हरीत क्रांती', अमेय प्रकाशन,
६) हेमंत टकले, 'काटेवाडी ते नवी दिल्ली', अविष्कार प्रकाशन.